## निवडक

### डॉ. गुरुदास नाटेकर यांचा सम्मान



■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ५ :** गोमंतकातील ज्येष्ठ साहित्यक डॉ. गुरुदास नाटेकर यांचा वाळपईतील गोमंतक मराठी साहित्य परिषदेच्या मराठी साहित्य संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक तथा गीतकार प्रसाद कुलकर्णी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. डॉ. नाटेकर यांची आजवर ३१ पुस्तके प्रकाशित झाली असून, त्यांनी आपल्या कादंबरीचा मराठी, हिंदी, कोकणी आणि इंग्रजीमध्ये अनुवाद केला आहे.
त्यांचे दोन संशोधनात्मक प्रबंध प्रकाशित झालेले आहे. त्यांच्या या कार्याची दाखल घेऊन मराठी साहित्य संमेलनात सम्मान करण्यात आला. यावेळी संमेलनाध्यक्ष चंद्रकांत गावस, माजी उपसभापती नरहरी हळदणकर, मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष संदीप केळकर, म्हाळू गावस, भालचंद्र मयेकर, वासुदेव गांवकर, अनुराधा म्हाळशेकर, यशवंत गावस, प्रकाश धवन व प्रेमानंद नाईक यांची उपस्थिती होती.

---



### नार्वे येथील आर्यादुर्गा देवस्थानात आज मध्वनवमी उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ४ :** नार्वे येथील आर्यादुर्गा देवस्थानात मध्वनवमी उत्सव ६ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनिशी साजरा होणार आहे. त्यानिमित्त सकाळी पुण्याहवाचन, आर्यदुर्गेस लघुरुद्र महाअभिषेक, कुंकुमार्चन, कुमारिका पूजन, आरती, महागाराणे, तद्नंतर तीर्थ प्रसाद, महाप्रसाद आदी कार्यक्रम होतील.

---

### गोवा मराठी पत्रकार संघाची आरवली, शिरोडा भागात सहल

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ४ :** चार दशकानंतर पुनरुज्जीवित झालेल्या गोवा मराठी पत्रकार संघातर्फे, ज्येष्ठ पत्रकार वामन प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली अनेक उपक्रम राबवायला सुरुवात केली आहे. अलिकडेच गोवा मराठी पत्रकार संघाची आरवली, शिरोडा भागात सहल झाली.
यावेळी आरवली शिरोडा येथील वि. स. खांडेकर संचालित गुरुवर्य बावडेकर विद्यालयाला व ज्ञानपीठकार साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या स्मारकाला, तसेच थोर साहित्यिक जयवंत दळवी यांच्या निवासस्थानाला भेट दिली. विद्यालयाचे मुख्याध्यापकानी तेथील स्मारक, जपून ठेवलेली खांडेकरांची दुर्मिळ हस्तलिखिते, छायाचित्रे इतर गोष्टी याविषयी माहिती दिली. खांडेकर बसायचे ती लाकडी खुर्ची, समोरचा डेस्क अजून जपून ठेवला आहे तसेच त्यांचा अर्धकृती पुतळा तिथे आहे. जयवंत दळवी यांच्या निवासस्थानी त्यांचे पुतणे, स्नुषा यांनी पत्रकार संघाच्या सदस्यांचे स्वागत केले.

---

### मुळगाव येथे देवी केळबाई देवीचा उद्या वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड



**डिचोली, दि. ५ :** गावकरवाडा मुळगाव येथील ग्रामदेवता श्री केळबाईचा वर्धापन दिवस शुक्रवार दि. ७ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांनिशी साजरा होणार आहे. सकाळी ८.३० वाजता श्रीचरणी लघुरुद्र तसेच पंचायतन देवस्थानास अभिषेक होईल. त्यानंतर दुपारी २ ते ३ दरम्यान आरती व महाप्रसाद , संध्याकाळी ५ ते ७ या कालावधीत नामस्मरण आणि रात्री १० वाजता श्री केलंबिका कला मंच शिरोडवाडी मुळगाव निर्मित व दत्तात्रय बर्वे दिग्दर्शित आणि यंदाच्या कला अकादमी नाट्य स्पर्धेत अभिनयासाठी चार प्रशस्तीपत्र प्राप्त झालेले दोन अंकी नाटक किरवंत हे नाटक साजरे केले जाईल .
सर्व भाविकांनी सदर कार्यक्रमास उपस्थिती लावून श्री कृपेचा लाभ घ्यावा तसेच नाट्य प्रयोगास रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शोभा आणावी, असे आवाहन ग्रामस्थ व केळबाई देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे.

---

### पेडणे केंद्रात बारावी परीक्षेची आसन व्यवस्था

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ५ :** गोवा शालान्त मंडळाच्या बारावीच्या परीक्षेची पेडणे केंद्राची आसन व्यवस्था जाहीर करण्यात आली आहे. पेडणे केंद्रातर्फे सरकारी उच्च माध्यमिक विद्यालयात एकूण ३४१ विद्यार्थ्यांची आसन व्यवस्था केली आहे. आसन व्यवस्था पुढील प्रमाणे – कला शाखा ५६४६३ ते ५६५४० (एकूण ७८).
वाणिज्य शाखा ५६५४१ ते ५६६२६ (एकूण ८६). विज्ञान शाखा ५६६२७ ते ५६६७५ (एकूण ४९). ओ एम शाखा ५६६७६, ५६७२७ ते ५६७३० (एकूण ५५).
ए इ टी ५६४६०, ५६७३१ ते ५६७६९ (एकूण ४०). एग्रीकल्चर ५६७७० ते ५६७८३ (एकूण १४).
इफ डी एम ५६४६१ ते ५६४६२, ५६७८४ ते ५६८०० (एकूण १९ एकूण) व्यवस्था आहे ह्या केंद्रात एकूण ३४१ विद्यार्थी बसणार आहेत. अधिक माहितीसाठी किर्तीमाला परब भ्रमण क्रमांक ८६९८०%३%९२ किंवा श्री राजेंद्र बोंद्रे भ्रमण क्रमांक ८२०८३६५००६ यांच्याशी संपर्क साधावा,असे कळविले आहे.

# भारत-इंग्लंड वनडे मालिका आजपासून

## सामना विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर : १५ महिन्यानंतर ज्यो रुटचे पुनरागमन

**मुंबई, दि. ५ :**

भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यातील ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका गुरुवार (६ फेब्रुवारी) पासून सुरू होत आहे. पहिला सामना नागपूरमधील विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर होईल. बुधवारी नागपूर एकदिवसीय सामन्यासाठी इंग्लंडने त्यांचा प्लेइंग इलेव्हन जाहीर केला. अनुभवी फलंदाज जो रूटला प्लेइंग इलेव्हनचा भाग बनवण्यात आले आहे. तो १५ महिन्यांनंतर एकदिवसीय सामना खेळताना दिसणार आहे. त्याने २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात त्याचा शेवटचा ५० षटकांचा सामना खेळला. या मालिकेद्वारे इंग्लंड आणि भारताचे लक्ष १९ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ ची तयारी करण्यावर आहे.





रूट इंग्लंडच्या टी२० संघाचा भाग नव्हता. जोस बटलरच्या नेतृत्वाखालील संघाने भारताविरुद्धची पाच सामन्यांची टी२० मालिका ४-१ ने गमावली. एकदिवसीय सामन्यांमध्येही इंग्लंडकडून बेन डकेट आणि फिल सॉल्ट डावाची सुरुवात करतील. रूट त्याच्या जुन्या तिसऱ्या क्रमांकाच्या स्थानावर खेळेल अशी अपेक्षा आहे. हॅरी ब्रुक चौथ्या क्रमांकावर येईल. कॅप्टन बटलर पाचव्या क्रमांकावर येईल. त्याच्यानंतर अष्टपैलू खेळाडू लियाम लिव्हिंगस्टोन आणि जेकब बेथेल यांचा क्रमांक लागतो. इंग्लंडने जोफ्रा आर्चर, ब्रायडन कार्स आणि साकिब महमूद यांची वेगवान गोलंदाज म्हणून निवड केली आहे. तर, अनुभवी फिरकी गोलंदाज आदिल रशीद देखील प्लेइंग इलेव्हनमध्ये आहे.

रूट हा या खेळातील महान खेळाडूंपैकी एक आहे. त्याने सर्व फॉरमॅटमध्ये चांगली कामगिरी केली आहे, असे बटलरने पहिल्या वनडे सामन्याच्या पूर्वसंध्येला पत्रकारांना बोलताना सांगितले. तो बऱ्याच काळापासून इंग्लंडच्या एकदिवसीय संघाचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्याला एकदिवसीय क्रिकेट खेळण्याचा व्यापक अनुभव आहे. ज्यामुळे आमच्या संघातील कमी अनुभवी खेळाडूंनाही फायदा होईल. आशा आहे की, तो आगामी सामन्यांमध्ये संघासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल.

हार्दिक पंड्या इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी नागपूरला रवाना होत असताना विमानतळावर सुरक्षेसाठी तैनात असलेल्या लष्कराच्या जवानाला त्याने सलामी दिली आणि हस्तांदोलन केले. आर्मी मॅनसोबत हार्दिक पंड्याचे हे वागणे पाहून चाहतेही आता सोशल मीडियायवरुन त्याच्यावर कौतुकांचा वर्षाव करत आहेत. हार्दिक पंड्याने इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत अप्रतिम कामगिरी केली होती.

# १००व्या कसोटीनंतर दिमुथ करुणारत्ने निवृत्त होणार

## गॅले येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धचा शेवटचा सामना

**नवी दिल्ली, दि. ५ :**



श्रीलंकेचा माजी कर्णधार आणि सलामीवीर दिमुथ करुणारत्ने त्याचा १०० वा कसोटी सामना खेळल्यानंतर निवृत्त होणार आहे. ६ फेब्रुवारीपासून गॅले येथे सुरू होणारा ऑस्ट्रेलियाविरुद्धचा सामना त्याच्या कारकिर्दीतील शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना असेल. श्रीलंकेचा संघ सध्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत ०-१ असा पिछाडीवर आहे.

खराब फॉर्ममुळे संघर्ष केल्यानंतर ३६ वर्षीय करुणारत्नेने निवृत्तीचा निर्णय घेतला. करुणारत्नेने श्रीलंकेसाठी ९९ कसोटी सामन्यांमध्ये ७१७२ धावा आणि ५० एकदिवसीय सामन्यांमध्ये १३१६ धावा केल्या. त्याने २०११ मध्ये एकदिवसीय स्वरूपात राष्ट्रीय संघासाठी पदार्पण केले. त्याने दोन्ही फॉरमॅटमध्ये १७ शतके केली.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटीत दिमुथ करुणारत्नेला दोन्ही डावात फक्त % धावा करता आल्या. गेल्या ७ कसोटींमध्ये त्याला फक्त १८२ धावा करता आल्या. त्याच्या नावावर फक्त एक अर्धशतक आहे, जे त्याने गेल्या वर्षी घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्ध झळकावले होते. त्याच्या निवृत्तीचे प्रमुख कारण म्हणजे खराब फॉर्म.

२०११ मध्ये एकदिवसीय पदार्पण केल्यानंतर, करुणारत्नेला २०१२ मध्ये कसोटी पदार्पण करण्याची संधी मिळाली. त्याने गॉल येथे न्यूझीलंडविरुद्ध पहिला सामना खेळला, ज्यामध्ये त्याने ६० धावा केल्या. आता करुणारत्ने त्याच्या कारकिर्दीतील शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना गॉलच्या मैदानावर खेळणार आहे. त्याने त्याच्या कसोटी कारकिर्दीत १६ शतके केली, ज्यामध्ये बांगलादेशविरुद्ध २४४ ही त्याची सर्वोत्तम धावसंख्या होती.

करुणारत्ने हा श्रीलंकेच्या कसोटी संघाचा एक महत्त्वाचा भाग होता. त्याने २०१४ मध्ये न्यूझीलंडमधील क्राइस्टचर्च येथे पहिले कसोटी शतक झळकावले. २०१५ पासून, त्याने सलामीच्या स्थानावर संघासाठी सातत्याने धावा केल्या आहेत. २०१७ मध्ये, त्याने पाकिस्तानविरुद्धच्या डे-नाईट कसोटीत १९६ धावा केल्या, त्यानंतर २०१९ मध्ये त्याला कसोटी कर्णधारपद देण्यात आले.

# चॅम्पियन्स ट्रॉफीच्या तयारीसाठी भारताला शेवटची संधी

## रोहित आणि कोहली फॉर्ममध्ये परततील का ?

**नवी दिल्ली, दि. ५ :**

इंग्लंडचा टी-२० मालिकेत एकतर्फी पराभव केल्यानंतर, टीम इंडिया आता ३ एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळणार आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीची तयारी करण्यासाठी भारताला ही शेवटची संधी आहे. यामध्ये, भारताला त्यांचे प्लेइंग-११ अंतिम करायचे आहे आणि स्पर्धेसाठी रणनीती देखील बनवायची आहे.

स्पर्धेपूर्वी टीम इंडियाला अनेक प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा फॉर्म परत येईल की नाही? जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद शमी यांचा फिटनेसही चिंतेचा विषय आहे. जर दोघेही पूर्ण लयीत गोलंदाजी करू शकत नसतील तर त्यांची उणीव कोण भरून काढेल?





टीम इंडियाचे वरिष्ठ फलंदाज विराट कोहली आणि कर्णधार रोहित शर्मा खराब फॉर्मशी झुंजत आहेत. २०२४ चा टी-२० विश्वचषक जिंकल्यापासून, कोहलीला फक्त एकच शतक करता आले आहे, तर रोहितला एकही शतक करता आलेले नाही. रोहितने श्रीलंकेविरुद्धच्या ३ एकदिवसीय सामन्यांमध्ये अर्धशतके झळकावली, पण दोन्ही खेळाडू कसोटी स्वरुपात अपयशी ठरले.

आयसीसीच्या मोठ्या एकदिवसीय स्पर्धेपूर्वी दोन्ही वरिष्ठ खेळाडू फॉर्ममध्ये नाहीत ही चिंतेची बाब आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर दोघांनाही जास्त धावा करता आल्या नाहीत, तर रणजी ट्रॉफीमध्येही दोघेही फलंदाजीत अपयशी ठरले. अशा परिस्थितीत, इंग्लंडविरुद्धची एकदिवसीय मालिका ही दोन्ही वरिष्ठ फलंदाजांसाठी मोठ्या स्पर्धेसाठी फॉर्ममध्ये येण्याची शेवटची संधी आहे.

२०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात भारताच्या गोलंदाजीचे नेतृत्व करणारे मोहम्मद शमी आणि जसप्रीत बुमराह दुखापतींमधून सावरत आहेत. शमी १४ महिन्यांनंतर परतला आणि इंग्लंडविरुद्ध २ टी-२० सामने खेळला. तथापि, तो रिदममध्ये दिसला नाही. त्याने ३ विकेट्स घेतल्या, पण त्याला खेळण्यात इंग्लिश फलंदाजांना कोणतीही अडचण आली नाही.

एकदिवसीय संघाचा फॉर्म पाहता, रोहित, शुभमन, विराट, श्रेयस, राहुल, हार्दिक, कुलदीप आणि शमी हे सध्या निश्चित मानले जातात. जर बुमराह तंदुरुस्त राहिला तर तो प्लेइंग-११ मध्येही खेळेल. त्यानंतर २ जागा रिक्त राहतील, ज्यासाठी १ गोलंदाज आणि ३ अष्टपैलू खेळाडू दावेदार आहेत. ज्यामध्ये अर्शदीप सिंग, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर यांचा समावेश आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारताचे संभाव्य प्लेइंग-११

रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल (यष्टीरक्षक), हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, मोहम्मद शमी, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग.

अतिरिक्त खेळाडू: अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, ऋषभ पंत, यशस्वी जयस्वाल.

# साखळीत ९ रोजी 'नाईक स्मृती संगीत समारोह'

## विविध सांगितिक कार्यक्रमांनी व सत्कार सोहळ्याने होणार साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ५ :** संगीत क्षेत्रातील कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी दरवर्षी साजरा करण्यात येणारा राधाकृष्ण संगीत अकादमी हरवळे सांखळीचा 'कै. धोंडू भिकू नाईक स्मृती संगीत समारोह' गोवा सरकारच्या कला व संस्कृती खात्याच्या सहकार्याने रविवार दि. ९ रोजी सकाळी ९.३० ते रात्री ९.३० पर्यंत शिवस्मृती, खेडेकर सभागृह साखळी येथे विविध सांगितिक कार्यक्रमांनी व सत्कार सोहळ्याने साजरा होणार आहे.



कै. धोंडू भिकू नाईक




गुरुदास गावकर



अमर मोपकर



पं. चंद्रकांत नाईक




अनुजा नाईक



अनुष्का नाईक



दिगंबर गावस



रामेश्वर डांगे



स्वानंदी नाईक



रामचंद्र नाईक



यशवंत देविदास



प्रेमानंद वेलिंगकर



इंद्रकांत कुडणेकर

सकाळी ९.३० वाजता उद्घाटन सत्र होणार असून या कार्यक्रमाला पद्मिनी फाउंडेशनच्या अध्यक्ष सुलक्षणा सावंत, खास निमंत्रित हरवळे ग्रामपंचायतीच्या सरपंच गौरवी गुरुप्रसाद नाईक, उद्योजक शिवदास गावस, उद्योजक चेतन सालेलकर, महालक्ष्मी फार्मसीचे मालक चंद्रकांत नारुलकर, कामाक्षी हार्डवेअरचे मालक रितेश नाईक व समाजसेवक नरेश दातये उपस्थित राहणार आहेत.

पहिल्या सत्रात सकाळी १०.१५ वाजता गुरुदास गावकर यांचे गायन, ११ वाजता अमर मोपकर यांचे एकेरी तबला वादन, ११.४५ वाजता पं. चंद्रकांत नाईक यांचे गायन होणार आहे.

दुसऱ्या सत्रात दुपारी ३ वाजता अनुजा नाईक व अनुष्का नाईक यांचे सहगायन, ३.४० वाजता दिगंबर गावस यांचे गायन, संध्याकाळी ४.२५ वाजता पं. रामेश्वर डांगे यांचे गायन तर ५.२० वाजता स्वानंदी नाईक यांचे गायन होणार आहे.

त्यानंतर सत्कार सोहळा होणार असून या सोहळ्याला अध्यक्ष म्हणून मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत,प्रमुख पाहुणे मये मतदार संघाचे आमदार व गोवा फलोत्पादन महामंडळाचे अध्यक्ष प्रेमेंद्र शेट,विशेष अतिथी गोवा राज्य पुरस्कार प्रपात ज्येष्ठ चित्रकार शिवानंद खेडेकर, विशेष निमंत्रित न्हावेलीचे विद्यमान पंचसदस्य कालिदास अनंत गावस, शास्त्रीय गायक पं. चंद्रकांत नाईक, समारोह प्रमुख राज मडगावकर, संस्थेचे अध्यक्ष प्रा. संतोष मळीक,सचिव दत्ताराम माडकर,कोषाध्यक्ष अनिल जल्मी उपस्थित असतील. यावेळी तबला वादक यशवंत देविदास, हार्मोनियम वादक इंद्रकांत कुडणेकर व भजनी कलाकार प्रेमानंद वेलिंगकर यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

या सोहळ्यानंतर ७.३० वाजता पं. सुधाकर देवळे यांचे गायन होणार आहे.

वरील कलाकारांना हार्मोनियमवर सुभाष फातर्पेकर, दत्तराज म्हाळशी, चांगदेव नाईक, कार्तिक च्यारी, अमोल गावस, सोहम बाक्रे, तबल्यावर तुळशीदास न्हावेलकर, पं. अविनाश पाटील,संकेत खलप, मिलिंद परब, गौरव गावस, गोविंद गावस, वासुदेव च्यारी व नगमा साथ उपेंद्र साळगावकर यांची असणार आहे. कार्यक्रमाचे निवेदन संजय सालेलकर करणार आहेत. ध्वनी संकलन राज मडगावकर यांचे असणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून विनामूल्य आहे.

**समितीची निवड–**

संगीत समारोह समिती निवडण्यात आली असून व्यासपीठ प्रमुख गोपाळ च्यारी, निधी प्रमुख महेश गावडे, स्वागत प्रमुख गजानन वांतेकर, प्रदर्शन प्रमुख राघव गावस, अल्पोपहार प्रमुख श्याम फातर्पेकर, सजावट प्रमुख ज्ञानेश्वर गावस हे आहेत, असे कळविले आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १५४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 154 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .